**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी, गट-अ (राजपत्रित) संवर्गात तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन आदेश क्रमांक :- पदोन्न-२०२५/प्र.क्र.११५ /ना.पु.१५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०००३२.
दिनांक :- २१ मे, २०२६.

**संदर्भ** :- १) शासन निर्णय,सा.प्र.वि., क्र. एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्या.१२, दि.१.८.२०१९.
२) शासन निर्णय,सा.प्र.वि., क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१.
३) शासन अधिसूचना, सा.प्र.वि., महसूल विभाग वाटप नियम, दि.१४.०७.२०२१.
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : वेपुर-११२१/प्र.क्र.४/सेवा-९, दि.१३.०२.२०२३.
५) शासन अधिसूचना, अ.ना.पु.व ग्रा.सं.वि., क्र.सेप्रनि-१२२०/प्र.क्र.१४०/ना.पु.१५, दि.२७.०३.२०२३.

**-: शासन आदेश :-**

निवडसूची सन २०२४-२५ या वर्षामध्ये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील खालील सहायक अन्नधान्य वितरण अधिकारी, गट-ब (राजपत्रित) (वेतनश्रेणी S-१७: ४७६००-१५११००) यांची जिल्हा पुरवठा अधिकारी /अन्नधान्य वितरण अधिकारी, गट-अ (राजपत्रित) (वेतनश्रेणी S-२०: ५६१००-१७७५००) या संवर्गात या आदेशाद्वारे विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून तात्पुरती पदोन्नती देऊन पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या पदावर व ठिकाणी करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | श्री/ श्रीम | सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे नाव | महसूल विभाग वाटप | पदस्थापनेचे पद व ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. | शालीनी वाघुजी गेडाम (दिव्यांग -अस्थिव्यंग) | नागपूर | अन्नधान्य वितरण अधिकारी, नागपूर. |

२. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग/१६-ब कार्यासनाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनांनुसार सदर पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच, दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्यात येत आहे.

३. सदर अधिकारी यांना जिल्हा पुरवठा अधिकारी, गट-अ संवर्गातील पदावरील पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१) दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट-अ व गट-ब मधील पदांवर पदोन्नतीबाबत सामान्य प्रशासन विभाग/१६-अ यांच्या दिनांक २०.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांनुसार सदर मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी संबंधित अधिकाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

३) सदर पदोन्नतीचे पद गट-अ (राजपत्रित) असल्याने, सदर पदावर देण्यात आलेली पदोन्नती (निवडसूची) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहील.

४) सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, गट-ब या संवर्गातून जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी, गट-अ या संवर्गात पदोन्नत झालेल्या अधिकारी यांनी पदस्थापनेच्या पदावर रूजू होवून कार्यभार स्विकारल्यानंतरच जिल्हा पुरवठा अधिकारी /अन्नधान्य वितरण अधिकारी, गट-अ (वेतनश्रेणी S-२०: ५६१००-१७७५००) या संवर्गाच्या वेतनाचे लाभ अनुज्ञेय राहतील.

४. म.ना.से. (सुधारित वेतन) नियम, २०१९ वेतननिश्चितीसंबंधी शासन परिपत्रक, वित्त विभाग, दिनांक २०.०२.२०१९ मधील परिच्छेद १३ (५) नुसार सदर पदोन्नत अधिकारी यांनी विहित मुदतीत वेतननिश्चितीचा विकल्प देणे आवश्यक राहील.

५. जिल्हा पुरवठा अधिकारी हे गट-अ (राजपत्रित) राज्यस्तरीय संवर्गातील पद असल्याने सदर अधिकारी यांना महसूल विभाग वाटप अधिसूचना, दि.१४.०७.२०२१ मधील तरतुदीनुसार महसूल विभागाचे वाटप करून त्यानुसार पदस्थापना देण्यात आली आहे.

६. सदर अधिका-याची जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी, गट-अ या पदावरील तात्पुरती पदोन्नती ही सदर अधिका-यांविरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही, या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे. त्यानुसार संबंधित उप आयुक्त (पुरवठा) यांनी खातरजमा करून संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु वा प्रस्तावित असल्यास शासनास अवगत करावे.

७. उप आयुक्त (पुरवठा) यांनी सदर अधिकारी यांना त्यांच्या सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करून पदोन्नतीच्या पदावर हजर करून घेण्याबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.

८. संबंधित उप आयुक्त (पुरवठा) यांनी, संबंधित अधिकारी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झाल्यानंतर, त्याबाबतचा रुजू अहवाल napu.15.mhpds@gov.in या ई मेल वर शासनास तात्काळ कळवावे.

९. सदर अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहित केलेल्या कालावधीमध्ये पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचे विरुध्द शासन निर्णय, सां.प्र.वि., क्र. संकिर्ण २०१६/ प्र.क्र.१६८ /१६/ कार्यासन-१४, दि.२३.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१०. सदर आदेश निर्गमित केल्यानंतर, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या **विहित अवधीतच,** सदर अधिकाऱ्यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या विहित कालावधीत पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा **"अकार्यदिन"** (dies non) म्हणून गणला जाईल, याची संबंधित अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

११. संबंधित अधिकाऱ्यांस शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करू नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मुळ कार्यालयाने सदर अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारू नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते सदर अधिकाऱ्यांच्या मुळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मुळ कार्यालयाकडे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

१२. संबंधित अधिकारी यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी, गट-अ या संवर्गातील पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का.१२,

दि.१२.०९.२०१६ अन्वये त्यांचे नाव सन २०२४-२५ च्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल व पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूच्यांमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी संवर्गातील पदावरील तात्पुरत्या पदोन्नतीसाठी त्यांची पात्रता तपासण्यात येईल.

१३. सदरील पदोन्नतीचे आदेश मा. न्यायालयात प्रकरण दाखल असल्यास त्या प्रकरणाच्या निर्णयाच्या अधिनतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

१४. वरील अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या सहायक अन्नधान्य वितरण अधिकारी यांचा अतिरिक्त कार्यभार अन्य सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे सोपविण्याची कार्यवाही संबंधित उप आयुक्त (पुरवठा) यांनी करावी.

१५. दि.२०.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये अन्नधान्य वितरण अधिकारी, नागपूर या रिक्त पदाचा श्री.विनोद नारायण काळे, तांत्रिक अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांच्याकडे सोपविण्यात आलेला अतिरिक्त कार्यभार या आदेशान्वये संपुष्टात आणण्यात येत आहे.

१६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५२११२२२५४३००६ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

POOJA PRASAD MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e52728f898604a75ff77b46e7415, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E6562F73D65107AD668D006B3B164, cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2026.05.21 12:23:40 +05'30'

**( पूजा मानकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

**उप आयुक्त (पुरवठा), नागपूर विभाग, नागपूर यांच्यामार्फत-**

१) श्रीम. शालीनी वाघुजी गेडाम, सहायक अन्नधान्य वितरण अधिकारी, नागपूर.
२) श्री. विनोद नारायण काळे, तांत्रिक अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर.

**प्रत:-**

१) मा.मंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) अ.मु.स. (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३) विभागीय आयुक्त, नागपूर
४) जिल्हाधिकारी, नागपूर.
५) उप आयुक्त (पुरवठा), नागपूर विभाग, नागपूर.
६) प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र राज्य -१ /२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई /नागपूर.
७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
९) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, अ.ना.पु.व ग्रा.सं.वि., मंत्रालय, मुंबई.
१०) उप सचिव (ई-३), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) निवडनस्ती, ना.पु.-१५.